


दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com




●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार २७ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ ले ● अंक १२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# प्रकाश आंबेडकर यांची विधानसभेपूर्वी मोठी खेळी, तिसरी आघाडी स्थापन करणार, यादोन बड्या नेत्यांना दिली ऑफर



वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी राज्यातील दोन बड्या नेत्यांना मोठी ऑफर दिली आहे. प्रकाश आंबेडकर हे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात मोठी राजकीय खेळी करण्याच्या तयारीत आहेत. राज्यात सध्या सत्ताधाऱ्यांची महायुती आणि विरोधकांची महाविकास आघाडी आहे. पण प्रकाश आंबेडकर मोठी खेळी करण्याच्या तयारीत आहेत. प्रकाश आंबेडकर राज्यातील जनतेच्या समोर पर्याय म्हणून तिसरी आघाडी स्थापन करणार आहेत. या तिसऱ्या आघाडीसाठीच प्रकाश आंबेडकर यांनी दोन मोठ्या नेत्यांना खुली ऑफर दिली आहे. यामध्ये पहिलं नाव हे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचं आहे. तर त्यांची दुसरी ऑफर माकप नेते तथा माजी आमदार जे पी गावीत यांना आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या या ऑफरमुळे महाराष्ट्राचं राजकीय समीकरण आगामी काळात बदलणार का? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

प्रकाश आंबेडकरांची माकपला ऑफर "माकपने तिसऱ्या आघाडी सोबत यावे. महाविकास आघाडीसोबत काडीमोड घ्यावी", असं आवाहन प्रकाश आंबेडकर यांनी माजी आमदार जे पी गावीत यांना केलं. राज्यातील तिसऱ्या आघाडीसोबत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने यावे, अशी खुली ऑफर प्रकाश आंबेडकर यांनी दिली."वंचित बहुजन आघाडी प्रयत्न करत आहे. आदिवासी आणि ओबीसी एकत्र ठेवत आहे. स्थानिक नेते आरक्षित मतदारसंघात निवडणुकीनंतर आदिवासी प्रश्न दुर्लक्षित करतात. आदिवासींवरील घटनात्मक बंधन आहेत. आदिवासींचे बजेट दिले जात नाही. खर्च ७२% तो इतर ठिकाणी आणि आदिवासी विकास विभागात निधीचा अभाव होतो. पाणी, रस्ता, घर या योजना सर्वांसाठी व्हायला पाहिजे", असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.

प्रकाश आंबेडकर आणखी काय-काय म्हणाले? "नाशिकमध्ये सुरू असलेले आदिवासी आंदोलन त्याला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. पेसा अंतर्गत भरती प्रक्रिया करून मागील प्रलंबित भरती केली पाहिजे. मुंबईत आमची बैठक होईल, ओबीसी नेते त्या बैठकीला असणार आहेत. आमची मुंबईची बैठक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर असणार आहे, त्यावर पुढील निर्णय घेतला जाईल. नागपूर येथे आदिवासींचा एकत्रित कार्यक्रम होईल, सर्व आदिवासी नेते एकत्र येण्याच्या दृष्टीने उपयोजना सुरू आहे", असं प्रकाश आंबेडक म्हणाले."नागपूर येथे मोठी सभा घेऊ. येत्या 1 संप्टेबरला नव्या आघाडीची घोषणा करू. हिंचासाचारावर सरकार बोलत नाही. जनतेची मानसिकता तुम्ही हिंसाचाराची करत आहेत.

## 'छगन भुजबळ यांनी आमच्यासोबत यावं'

"आमच्याकडे सत्ता द्या आम्ही फॉर्म्युला तयार केला आहे ओबीसी आणि मराठा समाजाला आरक्षण देतो. छगन भुजबळ यांनी आमच्यासोबत यावं. त्यांना खुली ऑफर देतो. छगन भुजबळ हेच १००% ओबीसी नेते. त्यांच्या पक्षात ओबीसींवर बोलले जाते का? त्यांनी सांगावं", असं प्रकाश आंबेडकर म्हणाले. "राज्यात अराजकता सुरू आहे. त्याला सर्व जबाबदार आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीवर राजकीय पक्ष कोणीही स्पष्ट भूमिका घेत नाही. ह्या परिस्थितीवर शरद पवार, उद्धव ठाकरे, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे जबाबदार आहेत", असा आरोप प्रकाश आंबेडकर यांनी केला. "लोकसभेत जरांगे पाटील यांनी ऐनवेळी हात मागे घेतला. जरांगे पाटील यांनी बोलल्याप्रमाणे विधानसभेचे उमेदवार यादी जाहीर करावी. आम्ही विधानसभा निवडणुकीत कोणासोबत जाण्यास तयार नाहीत", अशी भूमिका प्रकाश आंबेडकर यांनी मांडली




# गावंदरामध्ये टिप्परच्या धडकेत शेतकरी ठार संतप्त ग्रामस्थांनी केला रास्ता रोको अंदोलन

**किल्लेधारुर प्रतिनिधी :**

किल्लेधारुर : खामगाव-पंढरपुर या राष्ट्रीय महामार्गावर धारूर तालुक्यातील गांवदरा येथे भरधाव टिप्परने धडक दिल्याने रामा सिताराम घुले (वय 48) हे जागीच ठार झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. सततच्या अपघातामुळे टिप्पर चालकांच्या बेभान वर्तनामुळे संतप्त ग्रामस्थांनी रस्त्यावर ठिय्या मांडून संताप व्यक्त केला. धारुर तालुक्यातील गांवदरा ऊसतोड कामगार रामा सिताराम घुले (वय 48) यांना भरधाव टिप्पर (क्र. एमएच 21 बीएच 1600) याने आज दि.26 सोमवार रोजी सकाळी दहाच्या सुमारास जोराची धडक दिली. सदर अपघात खामगाव-पंढरपुर या राष्ट्रीय महामार्गावर घडला. या भीषण अपघातात रामा घुले यांचा जागीच मृत्यू झाला. यामुळे संतप्त ग्रामस्थांनी बस स्थानक परिसरात राष्ट्रीय महामार्गावर चक्का जाम केला. घटनेची माहिती मिळताच तहसील व पोलिस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. यावेळी ग्रामस्थांनी महामार्गावर भरधाव टिप्परमुळे अनेक अपघात होत असुन बिनधास्त वाहन चालवणाऱ्या टिप्पर चालकांवर कारवाई करण्याची मागणी केली. प्रशासनाकडून दखल घेण्याचे आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी रास्ता रोको मागे घेतला. यावेळी भाजपाचे युवानेते बाबरी मुंडे यांनी घटनास्थळी भेट दिली.

# भोपला येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी संतोष जानराव यांच्यामुळे पुढाकाराने गावात साजरी झाली पहिली जयंती

**केज । सचिन भालेराव**

पिढ्यानपिढ्या पासुन मागासलेला दलित समाज आता सामाजिक कार्यात पुढे येताना दिसत असुन समाजासाठी आपले आयुष्य खर्ची करणारे महापुरुष आज त्यांना कळायला लागले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील खेड्यापाड्यात या महापुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथी आज साजरे करत असल्याचे दिसून येत आहे. भोपला या गावातही लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती याच गावातील एक धाडसी नेतृत्व आणि पुणे येथे वास्तव्यास असणारे संतोष जानराव यांच्या पुढाकाराने गावात पहिली जयंती साजरी करण्यात आली. या बाबत अधिक माहिती अशी की केज तालुक्यातील भोपला हे एक छोटेसे खेडेगाव असून या ठिकाणी मातंग आणि बौध्द समाज अगदी थोडका आहे. त्यातच या ठिकाणच्या दलित समाजाला सामाजिक, धार्मिक कार्यक्रम करण्यासाठी जणु अद्याप पर्यंत कोणी वाटाड्याच



नव्हता. मात्र याच गावातील गरिबीचे चटके सोसुन सोसुन उदरनिर्वाह होत नसल्याने पोट भरण्यासाठी भोपला गाव सोडून पुणे या ठिकाणी गेलेले संतोष लिंबाजी जानराव ज्यांना शिक्षण नाही. तरी जिद्द आणि चिकाटीने स्वतःच्या हींमतीवर पुणे या शहरात हडपसर या ठिकाणी जगदंबा सिक्युरिटी सर्विस सेवा हि कंपनी स्थापन करुन आपले कुटूंब संभाळत आहेत. मात्र आपण समाजाचे काही देणे लागतो. या उद्देशाने त्यांनी आता गावातील समाजाला मागे वळून पाहिले.आणि गावाकडे येवुन सर्व मातंग आणि बौध्द या दोन्ही समाजातील समाज बांधवांना एकत्र करून गावात एक नविन आदर्श निर्माण करण्याचा सल्ला दिला. यामध्ये साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्याचे सर्वानुमते ठरले.आणि दोन्ही समाजाने एकत्र येऊन दि.२५ ऑगस्ट २०२४ रविवार रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त साठे नगर या ठिकाणी सकाळी ८:३० वा. या गावचे भुमिपुत्र संतोष जानराव यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाला गावातील जयंती कमिटीचे अध्यक्ष विकास शिंदे उपाध्यक्ष सोना शिंदे यांच्यासह नितीन शिंदे, लक्ष्मण जानराव, बापू शिंदे, गणेश जानराव, बाबासाहेब जानराव, विनोद शिंदे, अण्णासाहेब शिंदे, महादेव शिंदे, सदाशिव शिंदे, श्रीराम शिंदे, लिंबाजी जानराव, भैय्यासाहेब हजारे, अमोल शिंदे यांच्यासह अनेक समाज बांधव, महिला आणि गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर सायंकाळी पाच वाजता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची गावातून भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. गावात निघालेल्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पहिल्या जयंतीचे सर्व श्रेय या गावचे भूमिपुत्र आणि पुणे या ठिकाणी जगदंबा सेक्युरिटी सर्विस सेवा ही कंपनी चालवत असलेले त्या कंपनीचे मालक माननीय संतोष जानराव यांच्या या कार्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत असुन संतोष जानराव यांच्या पुढाकाराने केज तालुक्यातील भोपला या गावात निघालेली लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची पहिली जयंती ठरली असल्याने संतोष जानराव यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



बीड शहरातील धांडे गल्ली येथील सामाजिक कार्यकर्ते अँड विजयकुमार धांडे यांनी आज माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर गटात प्रवेश केला यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आणि युवा नेते रोहित क्षीरसागर यांनी त्यांचे स्वागत केले यावेळी ज्येष्ठ नगरसेवक नरसिंह नाईकवाडे, इंजि संतोष पवार हेही उपस्थित होते.

# गंगापूर धरणातील पाणी सोडल्यामुळे रामतीर्थावरील मंदिरे, दुतोंड्या मारुती पाण्याखाली.

**नाशिक । सुरेश इंगळे**

नाशिक शहर व जिल्ह्यात दोन दिवसापासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे गंगापूर धरण हे तुडुंब भरले असून त्यातून पाणी सोडल्यामुळे रामतीर्थावरील मंदिरे , दुतोंड्या मारुती पाण्याखाली गेला आहे. यावेळी पुराचे पाणी बघण्यासाठी नागरिकांनी खूप गर्दी केली आहे. पूर पाहण्यासाठी नागरिकांनी नदीलगत गर्दी न करण्याचे महानगरपालिकेने व जिल्हा प्रशासनानेआव्हान केलेले आहे. नाशिक शहरात दिवसभरात 15.3 मिलिमीटर पाऊस पडला. शनिवारी 24 तासात तब्बल 49.9 मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली आहे. पुढील तीन दिवस पावसाचा अंदाज कायम असल्याची संकेत असल्यामुळे पुराची पातळी वाढण्याची शक्यता आहे. गोदावरी नदीला पूर आल्यामुळे रामतीर्थ परिसरातील मंदिरे आणि परिसर हा पाण्याखाली गेलेला असून दशक्रिया करणाऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे अनेकांनी मिळेल त्या ठिकाणी दशक्रियाची विधी उरकावी लागत आहे. दरम्यान पाऊस सुरूच असल्याने विसर्ज वाढण्याच्या शक्यतेने नदीकाठच्या व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. गोदाकाठवर शहरासह जिल्हा राज्य ते देशभरातून भाविक नाशिकला येत असतात, परंतु सध्या रामतीर्थ पाण्याखाली गेल्यामुळे शहर व पंचवटी परिसरातील



दशक्रिया विधीसाठी आलेल्यांना मिळेल त्या ठिकाणी दशक्रिया विधी करावे लागत आहे. पाणी वाढण्याची शक्यता गृहीत धरत अनेकांनी पंचवटीतील दूतोंड्या मारुतीच्या पायऱ्याजवळ , शहराच्या बाजूने सद्गुरु ढगे महाराज समाधी, दत्त मंदिर परिसर, आधी ठिकाणी दशक्रिया करण्यास भर दिला आहे . पुढील तीन दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता वर्तवली असून त्यामुळे पूर वाढण्याची शक्यता आहे. नदीकाठचे व्यावसायिक रहिवाशांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दुतोंड्या मारुती पाण्याखाली गेला असून शहराच्या सखलभागात सुद्धा पाणी शिरलेले आहे. संततधार पावसासह वाऱ्यामुळे झाडांची पडझड सुरू आहे. त्यामुळे दरम्यान कोणीही झाडाखाली थांबू नये असा इशारा देण्यात आला आहे.

# परळी ते बीड बसवाहक महिला कर्मचाऱ्यांची प्रवाशांसोबत उद्धटपणा, बेशिस्त वर्तन

## बसमधील प्रवाशानी प्रश्न विचारले म्हणून चालू प्रवासातील बस २० मिनिटे

परळी । प्रतिनिधी
परळी ते बीड लालपरीने प्रवास करत असताना प्रवाशासोबत घडला धक्कादायक प्रकार पांगरी ता.परळी येथील पर्यायी नळकांडी पुल वाणनदीला आलेल्या पुरानी चार दिवसा पूर्वीच वाहून गेल्यामुळे महामंडळाने गेल्या चार दिवसापासून या महामार्गावरील बस सेवा वळवली आहे,परंतु रोड निश्चित न केल्याने याचा नाहक त्रास बस प्रवास करणाऱ्या प्रवाशांना होत आहे.परळी ते सोनपेठ, सोनपेठ ते शिरसाळा त्यानंतर बीड थेट बीडचे तिकीट मिळत नाही. तात्काळ रूट निश्चित करून थेट परळी ते बीड जाणाऱ्या प्रवासात तिकीट देण्याची व्यवस्था करावी. यामुळे प्रवास करणाऱ्या ग्राहकांना अतिरिक्त भाड्याचा त्रास सहन करावा लागत आहे. यावर आपण तात्काळ निर्णय घ्यावा अन्यथा आपली व आपल्या उद्धट वाहक व चालक यांची तक्रार आपल्यावरील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करणार असल्याचे पत्रकार बालाजी जगतकर यांनी सांगितले .परळी बस स्थानकाचे डेपो मॅनेजर यांना अनेक वेळा बस मधून फोन केला त्यांनी तो फोन उचलला नाही. परळी ते बीड बस मध्ये प्रवास करत करताना हा सर्व प्रकार घडला . सदरील परळी डेपो ची बसचा क्रमांक MH-20 BL-1882 या बसचे चालक व वाहक यांच्यावर कारवाई करण्यात यावी थेट तिकिटाची मागणी केल्यानंतर, व्यवस्थित बोलण्याऐवजी आपण वरिष्ठांशी बोला, व हुज्जत घालत बस मध्येच रस्त्यावर १५ ते २० मिनिटं थांबवली, पाठीमागून येणारी देखील बस अधिकारी आहेत म्हणून थांबून घेतली, त्या बसमधील वाहक व चालक हे सदरील बसमध्ये येऊन पत्रकार बालाजी जगतकर याच्यासह प्रवाशांना शांत राहण्याची सूचना करत होते. या उलट आपण परळीच्या डेपो मॅनेजर यांना बोला असे सांगण्यात आले व नंबर उपलब्ध करून दिला नाही. चर्चा अंति हा आपला नंबर देण्यात आला. बस मध्ये घडत असलेला प्रकार पत्रकार बालाजी जगतकर हे सर्व मोबाईल मध्ये रेकॉर्ड करत होते . वाहक महिला (कंडक्टरणे) पत्रकाराच्या हातातील व्हिडिओ रेकॉर्डिंग करत असलेला मोबाईल झडप मारून हिसकाटून घेतला, तो बराच वेळ दिला नाही. या वाहक महिलेने उडवा उडवी उत्तरे दिली. सर्व बसमधील प्रवासाला वेटीस धरले. एका पत्रकाराला व्हिडिओ करण्यापासून व वार्तांकन करण्यापासून रोखले,अशा हे बेशिस्त व उद्धटपन्नाची वागणूक देणाऱ्या वाहक व चालकावर योग्य ती कारवाई करा. अन्यथा आपल्या कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा पत्रकार बालाजी जगतकर यांनी दिला आहे.

## मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी बीड विधानसभा मतदारसंघात मुस्लिम समाजातील उमेदवाराला संधी देण्यात यावी-शेख निजाम

बीड । प्रतिनिधी
संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकारणाचे केंद्रबिंदू असलेले मराठा योद्धा मा. मनोज दादा जरांगे पाटील यांची शेख निजाम यांनी दिनांक 20 ऑगस्ट 2024 रोजी भेट घेतली व सदरील भेटीमध्ये विविध सामाजिक व राजकीय विषयावर चर्चा झाली त्यामध्ये प्रामुख्याने बीड जिल्ह्यातील बीड विधानसभा मतदारसंघ हा अत्यंत महत्त्वाचा मतदारसंघ मानला जातो बीड जिल्ह्यातील राजकारणामध्ये बीड विधानसभा मतदारसंघाचा प्रभाव फार मोठा आहे बीड विधानसभेच्या एकूण परिस्थितीनुसारच बीड जिल्ह्यातील इतर मतदार संघाचे निकाल अवलंबून असतात असा इतिहास आहे बीड विधानसभा क्षेत्रामध्ये मुस्लिम



अल्पसंख्याक समाजाची निर्णायक मते असून मुस्लिम समाज ज्या व्यक्ती पक्ष किंवा उमेदवाराच्या मागे उभा राहिला त्याचा विजय निश्चित मानला जातो याची प्रचिती मागील झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये माननीय खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांच्या विजया नमित्त आलेली दिसते मराठा आरक्षणाच्या संदर्भात मराठा योद्धा माननीय मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या आरक्षणाच्या लढ्यामध्ये मुस्लिम समाजाने लहान भावाची भूमिका बजावून मराठा समाजाच्या खांद्याला खांदा लावून मराठा समाजास आरक्षण मिळावे अशी भूमिका घेतली व मनोज जरांगे पाटील व त्यांच्या आंदोलनाला पूर्णपणे समर्थन व पाठिंबा दिलेला आहे त्यामुळे बीड विधानसभा मतदारसंघातील मुस्लिम मते निर्णायक असल्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये बीड विधानसभा मतदारसंघात मुस्लिम समाजाच्या उमेदवारास संधी द्यावी किंवा तशी शिफारस करावी असे शेख निजाम यांनी मनोज जरांगे पाटील यांच्याकडे मागणी केलेली आहे

## मांजरसुंब्याजवळ महामार्ग पोलीस कर्मचार्यास ट्रकने उडवले

(बीड-विवेक कुचेकर)धुळे-सोलापुर महामार्गावर काल सकाळी मांजरसुंबा महामार्ग पोलिस वाहनाची तपासणी करत असताना मालवाहु ट्रकला पोलिसांनि थांबविण्याचा प्रयत्न केला मात्र चालकाने ट्रक न थांबवता थेट पोलिसाच्या अंगावर घातला यावेळी दोन्ही चालकाच्या मधोमध पोलिस अडकल्याने गंभीर जखमी झाला असुन त्याला रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.धुळे-सोलापुर महामार्गावरील मांजरसुंबा रस्तयावर महामार्ग पोलिस कर्मचार्यास ट्रकने जोराची धडक दिल्याने जखमी पोलीस कर्मचारयास बीड येथिल खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. दि.२६ ऑगस्ट रोजी सकाळी मांजरसुंबा येथे महामार्ग पोलीस वाहनाची तपासणी करत असताना Rj 09 gc 4609 या मालवाहु ट्रक चालकास थांबण्यास सांगितले असता त्यांनी वाहन अधीक वेगाने चालवत पोलीसाच्या अंगावर ट्रक घातला त्यात महामार्ग पोलीस कर्मचारी चालक गजानन पराड यांना जोराची धडक दिल्याने रस्तयावर पडले दोन्ही टायरच्या मध्ये पडल्याने सुदैवाने जिवितहानी झाली नाही मात्र पोलीस कर्मचारी कर्मचारी किरकोळ जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी बीड मधील लोटस या खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले असुन प्रकृती स्थीर असल्याची माहीती मिळत आहे.पोलीसांनी ट्रक चालकास ताब्यात घेतले असुन पुढील चौकशी पोलीस करत आहेत.

# ज्ञानराधा,साईराम,जिजाऊ,राजस्थानी मल्टिस्टेटविरोधात ठेवीदारांची वज्रमुठ

## एकाच दिवशी १६७० ठेवीदारांचे तक्रार आर्थिक गुन्हे शाखेत दाखल

## कुटे,कुलकर्णी, परभणे,बियाणी यांना पोलिस प्रशासनाचे सहकार्य-प्रा.सचिन उबाळेंचा आरोप

बीड । प्रतिनिधी
जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, मराठवाडा अर्बन (माजलगाव) परळी पीपल्स पतसंस्थांविरोधात स्वाभिमान संघटनेचे जिल्हाप्रमुख प्रा.सचिन भैय्या उबाळे यांच्या उपस्थितीत आज जिल्ह्यातील ठेवीदारांनी वज्रमुठ आवळत १६७० तक्रार अर्ज आिर्थक गुन्हे शाखेकडे दाखल केले. दरम्यान, सुरेश कुटे अटक असूनही ज्ञानराधाच्या तपासाला गती नाही. अर्चना कुटे, यशवंत कुलकर्णी, परभणे, बियाणी यांना बीडच्या पोलिस प्रशासनाचे सहकार्य असल्याचा आरोप प्रा.उबाळे यांनी ठेवीदारांच्या बैठकीत केला. जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या मल्टिस्टेट, पतसंस्थाविरोधात एक हजार गुन्हे दाखल करण्याचा इशारा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाप्रमुख तथा ठेवीदार संघर्ष कृती समिती महाराष्ट्र राज्य मुख्य प्रवर्तक प्रा. सचिन भैय्या उबाळे यांनी दिला होता. या संदर्भात शहरातील सूर्या लॉन्स येथे सोमवारी (दि.२६) सकाळी ११ वाजता ठेवीदारांची बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्ह्यातील जवळपास अडीच हजार ठेवीदार उपस्थित होते. यावेळी प्रा.उबाळे म्हणाले की, अर्चना कुटे, यशवंत कुलकर्णी, साईनाथ परभणे, चंदुलाल बियाणी यांना अटक केल्याशिवाय पोलिसांना सुट्टी मिळणार नाही. ठेवीदारांचा एक ना एक रुपया मिळाल्याशिवाय आता माघार घेणार नाही. प्रत्येक वेळी ठेवीदारांनी एकजुट दाखविली आहे, ही एकजुट महत्वाची असून ती कायम ठेवा. ठेवीदारांच्या ताकदीमुळे मी कुणालाही घाबरत नाही. अखेरपर्यंत ठेवीदारांचे एकजुट महत्वाची आहे. सुरेश कुटेंना अटक करुन दोन महिन्यांचा कालावधी लोटला तरी ज्ञानराधाचा तपास संथ गतीने सुरू आहे. अर्चना कुटे, यशवंत कुलकर्णी, साईनाथ परभणे, चंदुलाल बियाणी अजुनही फरार आहेत. पोलिस प्रशासनाच्या सहकार्यामुळेच सर्वजण सुखरुप फरार आहेत, असा आरोप प्रा.उबाळे यांनी केला. येत्या आठ दिवसांत ठेवीदारांच्या प्रश्नासाठी मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत बैठक घेण्यात येणार आहे. सर्व आरोपींना



अटक न केल्यास गृहमंत्र्यांकडे बीड पोलिसांची तक्रार करणार असल्याचा इशारा प्रा.उबाळे यांनी दिला. ठेवीदारांना आरोपींवर गुन्हा दाखल करण्यासंदर्भात कागदपत्रांची माहिती व्हावी यासाठी उच्च न्यायालयाचे ॲड.विशाल कदम यांनी ठेवीदारांना न्यायालयीन लढाईसंदर्भात मार्गदर्शन केले. मराठवाड्यातील ठेवीदारांच्या घेणार गाठीभेटी जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट आदी पतसंस्थांमध्ये मराठवाड्यातील ठेवीदारांच्या ठेवी मोठ्या प्रमाणात अडकल्या आहेत. या ठेवीदारांना गुन्हा दाखल करण्यासंदर्भात पुरेशी माहिती नसल्याने सर्वजण गोंधळून जात आहेत. यामुळे उच्च न्यायालयाचे ॲड.विशाल कदम साहेब यांना सोबत घेऊन मराठवाड्यातील ठेवीदारांच्या गाठीभेटी घेऊन त्यांना कायदेशीर माहिती दिली जाणार असल्याचे प्रा.सचिन उबाळे यांनी सांगितले.

ठेवीदारांचे प्रतिनिधी म्हणून प्रा सचिन उबाळेंनी विधानसभा लढवावी; ठेवीदारांचा एकमुखी निर्णय सुर्या लॉन्स येथे सोमवारी झालेल्या बैठकीत जिल्हाभरातील ठेवीदार उपस्थित होते. यावेळी काही ज्येष्ठ ठेवीदारांनी आजपर्यंत एकही राजकीय पुढारी ठेवीदारांच्या बाजूने उभा राहिला नाही. यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत बीडमधून ठेवीदारांचा प्रतिनिधी म्हणून प्रा.सचिन उबाळे यांनी निवडणूक लढवावी असे मत व्यक्त केले. यावेळी उपस्थित अडीच हजार ठेवीदारांनी टाळ्यांचा कडकडाट करुन ठेवीदारांचे प्रतिनिधी म्हणून उबाळेंनी विधानसभा लढवावी असा निर्णय घेतला. गेल्या वर्षभरापासून प्रा.सचिन उबाळे यांनी आमरण उपोषणे, आंदोलने, मोर्चा काढून ठेवीदारांचा प्रश्न लावून धरला आहे. सुरेश कुटे यांना झालेली अटक हे याच आंदोलनाचे फलित आहे.

- - - - - - - - - - -

# अंबाजोगाई बसस्थानकाच्या कंत्राटी कामाची कसून चौकशी केल्यास लाखो रुपयांचा भ्रष्टाचार उघडकीस येणार

अंबाजोगाई ।परवेज पटेल जुनी बिल्डींग जशास तशी ठेऊन ब्युटीपार्लर प्रमाने सजवलेल्या अंबाजोगाई बसस्थानकाच्या कंत्राटी कामाची कसून चौकशी केल्यास लाखो रुपयांचा भ्रष्टाचार उघडकीस येणार आहे मागील 4 वर्षा पूर्वी मोडखळीस आलेल्या अंबाजोगाई बसस्थाकाच्या विस्तारी करणाच्या कामास सुरुवात झाली. या वेळी कंत्राट दाराने बस स्थानकाची जुनी कोंक्रेटची इमारत व त्या बाजूचे 4 बस थांब्याचे गाळे जशास तसे ठेऊन उर्वरित विस्तारी करणाच्या कामाला प्रारंभ केला. कोरोना कालावधी मध्ये अतिशय संथ गतीने हे काम सुरू होते. मात्र त्या नंतर या कामाने गती घेतली आणि पाहता पाहता बस स्थानकाच्या मागील बाजूने 5 आणि पुढील बाजूने 4 नवीन गाळे बांधून तयार केले त्या मुळे बसस्थानकात एकूण 13 गाळे तयार झाले कोणाला काही समजण्याच्या आतच कंत्राटदाराने नव्या बांधकामा सह नवीन मोडखळीस आलेल्या इमारतीलाही अशी सजावट केली जणु एखाद्या लग्नामध्ये बोहल्यावर ब्युटीपार्लर मधून आणून नव्या नवरीला उभा केले आहे त्या मुळे ही इमारत



पाहणाऱ्या सर्वांना ही इमारत नवीन वाटू लागली त्या मुळे कुठेही याची वाच्यता झाली नाही. हा सर्व प्रकार शहरातील लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, माध्यम प्रतिनिधी उघड्या डोळ्याने पाहात होते मात्र कोणीही या संदर्भात ब्र शब्द ही काढला नाही आणि काढत ही नाहीत. ब्युटीपार्लरच्या माध्यमातून सजवलेल्या अंबाजोगाई बस स्थानकाला स्वछता करणाऱ्या सफाई कामगारा मुळे काही महिन्या पूर्वी स्वच्छतेचे 10 लाख रुपयांचे परितोषक ही मिळाले, या परितोषकाचे श्रेय निश्चित सफाई कामगारांना द्यावे लागेल मात्र आज ही बसस्थानक परिसरातील बेड कॉंक्रीटचे काडीचेही काम झालेले नाही. त्या मुळे पाऊस पडला की ब्युटीपार्लरच्या माध्यमातून सजलेल्या अंबाजोगाई बस स्थानकाचे खरे रूप प्रवाशांना व शहर वासीयांना अनुभवयास येते. पाऊस पडल्यावर बस स्थानक परिसरात चालणे म्हणजे एक प्रकारची तारेवरची कसरतच असते एसटी महामंडळाचे प्रशासन सुद्धा एवढे बधीर झाले आहे बस स्थानकामधील खड्ड्यामुळे अनेक बसेसचे पाटे तुटले त्यांचे आर्थिक नुकसान झाले मात्र ना याच्याशी आगार प्रमुखाला ना विभाग नियंत्रकाला कोणालाच देणे घेणे नाही

एकूणच जुनी बिल्डींग जशास तशी ठेऊन ब्युटीपार्लर प्रमाने सजवलेल्या अंबाजोगाई बसस्थानकाच्या कंत्राटी कामाची चौकशी होणे आवश्यक आहे. ही चौकशी केल्यास लाखो रुपयांचा भ्रष्टाचार उघडकीस येणार आहे. राजकीय विरोधी पक्ष सामाजिक संघटना, माहिती अधिकार कार्यकर्ते कोणीच आता शहरात शिल्लक नसल्यामुळे व तक्रारदार नसल्यामुळे चौकशी कोण करणार हा खरा मूळ प्रश्न आहे

# रॅगिंग विद्यार्थ्यांचे भविष्य उध्वस्त करु शकते--हनुमंत भोसले

केज । सचिन भालेराव महाविद्यालयीन जीवनात अनेक विद्यार्थी स्वैर वागताना आपल्या खालच्या वर्गातील व आपल्यापेक्षा लहान विद्यार्थ्यांचा विविध प्रकारे मानसिक व शारीरिक छळ करतात. यामुळे अनेक विद्यार्थी मोठ्या विद्यार्थ्यांनी सार्वजनिक ठिकाणी व जाहीरपणे केलेला असा छळ, टिंगल चेष्टा-मस्करी सहन करू शकत नाहीत व परिणामतः आत्महत्या करतात. या बाबी कायद्याने गुन्हा असून यासाठी कायद्यात किमान दोन वर्षांचा कारावास व दहा हजार रुपये दंड अशा शिक्षेचे प्रावधान असून अशा गोष्टीपासून विद्यार्थ्यांनी दूर राहावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते केज न्यायालयाअंतर्गत कार्यरत पॅरालीगल वॉलिनटीअर हनुमंत भोसले यांनी केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड व जिल्हा सत्र न्यायालयाच्या वतीने आयोजित केज येथील




बाबुराव आडसकर महाविद्याल्यात "अँटीरॅगिंग" मार्गदर्शन शिबिरात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य एम जी फावडे हे होते तर विचारपीठावर ॲड एस व्ही मिसळे, पीएलव्ही संजय , भाग्यश्री काकडे, प्रा किर्दत, प्रा डॉ हिरवे यांची उपस्थिती होती. रॅगिंग सारख्या बाब विद्यार्थ्यांमध्ये गुन्हेगारी वृत्ती निर्माण करते. वरच्या वर्गातील विद्यार्थी अहंमभावातून खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांचा मानसिक व शारीरिक छळ होईल अशी कृत्ये करतात. ज्यामध्ये सार्वजनिक ठिकाणी जाहीररीत्या त्यांना अपमान वाटेल अशी कृत्ये ज्यामध्ये उद्या मारणे, उठबश्या काढणे, अर्ध नग्न होणे, गाणे म्हणणे किंवा इतर लाज वाटेल असे कृत्य करायला सांगतात, त्यांना उद्धेशून टोमणे मारले जातात. त्यांनी मनासारखे तसे न केल्यास त्यांना हाण-मार केली जाते. यामुळे कांही विद्यार्थी अशा गोष्टी सहन न करू शकल्याने जीवन संपवतात. वास्तविक पाहता या बाबी कायद्याने चुकीच्या असल्याने अशा गोष्टी करणाऱ्या विद्यार्थ्यांना कायद्याने दोन वर्षांचा कारावास व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा आहे. इतकेच नाही तर असा गुन्हा करणाऱ्या विद्यार्थ्यांस किमान पाच वर्षे किंवा कायमची शिक्षण बंदीची शिक्षा दिली जाऊ शकते. म्हणून विद्यार्थी व पालकांनीही आपली मुले अशा गुन्हेगारीच्या जाळ्यात अडकणार नाहीत याची काळजी घ्यावी असे आवाहनही हनुमंत भोसले यानी केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य एम जी फावडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जेष्ठ विधिज्ञ एस व्ही मिसळे यांनी केले. यावेळी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.




राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नितीन पाटील यांची आज राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली. यावेळी त्यांनी विधानभवनात निवडणूक अधिकाऱ्यांकडून पत्र स्वीकारले. बिनविरोध निवड झाल्याबद्दल पक्षाचे कोषाध्यक्ष आणि सरचिटणीस आमदार शिवाजीराव गर्जे यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी पक्षाचे सहकोषाध्यक्ष संजय बोरगे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीतील ब्रम्हा, विष्णु, महेश

आधुनिक महाराष्ट्राचे ब्रम्हा, विष्णु, महेश म्हणून कै यशवंतरावजी चव्हाण, कै. वसंतराव नाईक, कै. डॉ. शंकररावजी चव्हाण हे होत. यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये फार मोठे योगदान होते. मित्रहो भुतकाळातील इतिहास पाहता महाराष्ट्राच्या विकासासाठी दिवंगत या थोर नेत्यांनी जे महत्वाचे कार्य पार पाडले याची तुलना नाही. यशवंतरावाच्या दुरदृष्टीमुळे सत्तेचे विकेंद्रियकरण झाले ग्रामपंचायत ते पंचायत समिती, पंचायत समिती ते नगर पालिका या स्थानिक संस्थाची निर्मिती करुन ग्रामीण भागाचा कायापालट करण्याचे तंत्र यशवंतरावांनी निर्माण केले. हे करण्याचे भाग्य यशवंतरावांना लाभले. त्यामुळे सामान्य माणसाला सत्तेत भागीदार होणे व विकास करणेची संधी मिळाली. यशवंतराव चव्हाणांनी उपेक्षित दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या बंजारा समाजातील सुशीक्षित गर्भ श्रीमंत गरिब माणसासी नाळ जोडलेली आहे. वकिली व्यवसाया पासून समाजकारण करणारा वसंत हेरला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी रंजल्या-गांजल्या समाजाची उपेक्षितांची सेवा केली. वसंतरावाचा जन्म शेतकरी कुटूंबात झाल्यामुळे त्यांची नाळ शेतीशी आपोआपच जोडल्या गेली. शेतकऱ्यांना जादा उत्पन देणारे बियाणे, खते, अवजारे देऊन हरितक्रांती घडविली. बंजारा समाजाच्या वेदना समजावून घेऊन त्यांच्या समस्या सोडावल्या. कै. डॉ. शंकरराव चव्हाणानी पाणी व त्याचे नियोजन हे काय असते हे संपुर्ण महाराष्ट्राला दाखवले गेल्या







दोन वर्षापुर्वी महाराष्ट्रामध्ये भिषण दुष्काळ पडला होता. पाणी पिण्यासाठी मिळत नव्हते. रेल्वेने महाराष्ट्रातील जनतेला पिण्यासाठी पाण्याचा पुरवठा करावा लागला. सामान्य माणसाचा घसा कोरडा होत होता त्यावेळस संपुर्ण महाराष्ट्र नव्हे तर देशाला कै. डॉ. शंकरराव चव्हाण हे काय होते समजले. त्याचबरोबर राष्ट्रीय पातळीवर विविध पदे सांभाळतांना एकुणच हिंदूस्थानच्या जडणघडणीचा व विकासाचा विचार केला. महाराष्ट्राच्या राजकारणांवर आणि प्रशासनांवर त्यांची बळकट पकड होती. ते कठोर प्रशासक होते. हा गुण त्यांना उपजतच लाभला होता. कै. डॉ. शंकरराव चव्हाणांनी सामान्य जनतेच्या हिताचे अनेक कायदे करुन सर्वसामान्यांना कसेल त्याची जमीन कुळ कायदयाची कठोरे अमलबजावणी करुन जमीनदाराच्या जमीनीचा ताबा कुळास स्वतः हजर राहून देण्यास भाग पाडले.असे हे दुरदृष्टी नेते, या तिन्ही महामुर्तीचे महाराष्ट्रातील जनतेची सेवा केली. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले या उक्तीप्रमाणे महाराष्ट्रासाठी कार्य केले. यशवंत, वसंत, शंकर ना होते तो हम कंहा होते भगवानही जानता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्यांची निती, नैतिकता, निष्कलंक चारित्र्य, आजच्या तरुण पिढीपुढे आदर्श उदाहरण आहे. आजचे हे महाराष्ट्रातील सरकार नव्याने सत्तेवर आले असून या नविन सरकारला प्रशिक्षण घेण्यातच पाच वर्ष निघून जाणार तो पर्यंत शेतकऱ्यांचा किती बळी जाणार हे ईश्वररुपी जानो. आजचे सरकार हे तुकोबारायांच्या ओवीतील बोले एक चाले एक त्याचे पाहूनये मुख असेच आहे. महाराष्ट्रात होवून गेलेले आधुनिक ब्रम्हा, विष्णू, महेश यांचा महाराष्ट्रातील तमाम जनतेला व महाराष्ट्रातील शेतीत राबणाऱ्या शेतकऱ्यांना सार्थ अभिमान आहे.

नामदेवराव केशवे
मु.पो.आष्टा ता.माहुर जि.नांदेड
मो.नं.9763881477

# कृषी महोत्सवातील पशुप्रदर्शनाला पशुपालकांचा चांगला प्रतिसाद

**बीड। प्रतिनिधी**

बीड, दि. 26 : राज्यस्तरीय कृषी महोत्सवातील प्रशुप्रदर्शनाला पशुपालकांनी चांगला प्रतिसाद दिला आहे.सध्या परळी वैजनाथ येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सव सुरू आहे यामध्ये पशुप्रदर्शनचे मोठे दालन आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली पशु प्रदर्शन भरविण्यात आले आहे. उद्या सोमवारी महोत्सवाचा शेवटचा आणि समारोपाचा दिवस आहे.

पशुप्रदर्शनामध्ये प्रामुख्याने गाय वर्गांच्या विविध अकरा जाती त्यामध्ये लाल कंधारी, देवणी,



पुंगणुर, खिल्लार, डांगी, गौवळावू ,संकरित एच एफ क्रॉस, संकरित जर्सी ,कॉंक्रेज गायी आहेत. म्हैस वर्गामध्ये मुरहा, मेहसाना, जाफराबादी, पंढरपुरी, मराठवाडी, नागपुरी, इत्यादी म्हैस पशुधनाने सहभागी आहेत. तसेच शेळी वर्गामध्ये उस्मानाबादी शेळी व बीटल शेळी व मेंढी वर्गामध्ये डेकनी व माडग्याळी मेंढी, कुकुट पक्षांमध्ये गिरीराज वनराज कावेरी व कडकनाथ व अश्वमध्ये काठीयावाडी ,मारवाडी, सिंधी, पंजाब नुकरा तर श्वानांमध्ये लेब्राडोर, जर्मन शेफर्ड, पामेरियन ,मुधोळ हंट, गोल्डन रिट्रायव्हर, कारवान ,डॉबरमॅन इत्यादी श्वान वर्गाने सहभाग नोंदवला आहे. सदरील पशुप्रदर्शनासाठी पशुपालक हे नागपूर, नाशिक, सोलापूर ,नांदेड, लातूर इत्यादी विविध भागातून आले सदरील पशुप्रदर्शनास नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला पशुप्रदर्शन कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. प्रकाश लक्ष्मणराव आघाव पशुधन विकास अधिकारी परळी वैजनाथ हे कामकाज पाहत आहेत.

## भारतीय जनता पार्टी जसखार यांच्या मार्फत मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना अंतर्गत पात्र झालेल्या महिला - भगिणींसाठी आमदार महेश बालदी यांच्या कडून खास रक्षाबंधन साडी भेट.



उरण (सुनिल ठाकूर ) : आज जसखार गावात दि २५.०८.२४ रोजी भारतीय जनता पार्टी जसखार यांच्या मार्फत मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना अंतर्गत पात्र झालेल्या महिला - भगिणींसाठी आमदार मा.श्री. महेश बालदी साहेब यांच्या कडून खास रक्षाबंधन साडी भेट म्हणून देण्यात आली . सदर कार्यक्रमासाठी भारतीय जनता पार्टीच्या रायगड जिल्हाच्या महिला मोर्चाच्या उपाध्यक्षा श्रीमती संगीता पाटील , शिवसेनेच्या रायगड महिला उपजिल्हा प्रमुख श्रीमती वैजयंती ठाकूर , शिवसेना उरण शिवसेना उपतालुका प्रमुख अमित ठाकूर ,उरण तालुकाप्रमुख श्रीमती प्रणाली म्हात्रे , जसखार गावचे माजी सरपंच श्री दामोदर घरत ,जसखारचे माजी अध्यक्ष श्री उमेश पारवे, वैभव सामाजिक संस्थाचे अध्यक्ष वैभव ठाकूर , व शिवसेनेच्या प्रीती ठाकूर ,भारतीय जनता पार्टीचे जसखार गावचे अध्यक्ष अक्षय घरत ,ग्रामपंचायतच्या सदस्या हेमलता ठाकूर,दमयंती म्हात्रे, सीमा घरत ,व भारतीय जनता पार्टीचे गोरक्षनाथ घरत व भारतीय जनता पार्टी व शिवसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यक्रमला मोठ्या प्रमाणात महिलानी उपस्थि लावली व रक्षाबंधन भेट स्वीकारली.

# हरिणाची शिकार करणारे चार शिकारी मांस व शिकारीच्या साहित्यासह पोलिसांच्या ताब्यात

## स्थानिक गुन्हे शाखेची केज तालुक्यात मोठी कारवाई तिघांना तीन दिवसांची पोलीस कोठडी तर एक अल्पवयीन

**केज/प्रतिनिधी**

केज तालुक्यात वरपगाव येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करून हरिणाची शिकार करून त्याच्या मासांची वाटणी करीत असताना चौघांना रंगेहाथ ताब्यात घेत त्यांना अटक केली आहे. चौघा शिकाऱ्या पैकी एकजण अल्पवयीन असून तिघांना न्यायालयाने तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. या बाबतची अधिक माहिती अशी की, दि. २४ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरक्षक मुरकुटे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जगताप, पोलीस जमादार गायकवाड, पोलीस हवालदार शिंदे, पोलीस हवालदार राठोड, पोलीस नाईक राजू पठाण, यादव, उगले आणि वडमारे हे केज उपविभागात गस्त घालीत असताना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी फोनव्दारे पोलीस उपनिरिक्षक मूरकुटे यांनी कळविले की. केज तालुक्यातील वरपगांव शिवारात पारधी वस्तीवर राहणारे बन्सी पवार याचे पत्राचे शेडमध्ये काळविट मारुन त्याचे वाटे करणे चालू आहे. त्या प्रकरणी कारवाई करण्याचे आदेश दिले. आदेश मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वरपगाव येथे सायंकाळी ६:३० छापा टाकला. त्यावेळी बन्सी पवा यांच्या पत्र्याच्या शेडमध्ये भैय्या बन्सी पवार, सुनिल ज्ञानोबा पवार, लाला शहाजी शिंदे आणि एक अल्पवयीन मुलगा हे चार ईसम गोलाकार बसुन





काळवीटाचे मासांचे हत्याराने तुकडे वाटे करताना दिसले. त्याचे समोर एक काळवीटाचे दोन शिंगे असलेले मुंडके, ईतर दोन काळवीटाचे शिंगे होती. त्यांना पोलिसांनी आम्ही ताब्यात घेतले. त्या नंतर दोन पंचा समक्ष भैय्या बन्सी पवार याचे ताब्यातुन काळवीटाचे कापलेले दोन शिंगे असलेले मुंडके, लाला शहाजी शिंदे याचे ताब्यातुन काळवीटाचे दोन शिंगे, संजय बन्सी पवार याचे ताब्यातुन एक विळा, एक सुरा, एक कत्ती, एक चाकु हे साहित्य तसेच सुनिल ज्ञानोबा पवार याचे ताब्यातुन अंदाजे २० किलो वजनांचे काळवीटाचे मासांचे व हाडाचे तुकडे दोन पंचा समक्ष जप्त करण्यात आले. मुद्देमाल जप्त करते वेळी धाराशिव जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरक्षक सचिन खटके, सहाय्यक पोलीस निरिक्षक अमोल मोरे, पोलीस हवालदार हुसेन सय्यद, पोलीस हवालदार प्रदीप वाघमारे हे उपस्थित होते. सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हनुमान खेडकर यांच्या तक्रारी वरून केज पोलीस ठाण्यात भैय्या बन्सी पवार, सुनिल ज्ञानोबा पवार, लाला शहाजी शिंदे आणि एक अल्पवयीन मुलगा गु र नं. ४५८/२०२४ वन्य जीव प्राणी संरक्षण कायदा अधिनियम १९७२ चे कलम ३, ४९, ५०, ५१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस जमादार बाबासाहेब बंगर हे तपास करीत आहेत. तिघा शिकाऱ्यांना ना न्यायालयाने दि. २८ ऑगस्ट पर्यंत तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

- - - - -

संभाजीनगर विभागाचे मुख्य वनसंरक्षक हनुमंत धुमाळ आणि विभागीय वनाधिकारी ए डी गरकल यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त वनपाल नवनाथ पाईक, वनपरिक्षेत्र अधिकारी उत्तम चिकटे आणि वनपाल मोरे यांच्या आदेशाने वनमजूर वचिष्ट भालेराव, संभाजी पारवे, नवनाथ जाधव, वाहन चालक शाम गायसमुद्रे सिद्धेश्वर चव्हाण ऑपरेटर मनोज डोरनाळे, जीवन गोके यांनी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पशू वैद्यकीय अधिकारी डॉ. एस. पी. थळकरी, डॉ. श्वेता जोशी, डॉ. प्रितम आचार्य, डॉ. प्रल्हाद जाधव, सुशील मस्के, डॉ. धोंडिबा चवडे, डॉ ऋषीकेश सिरसट यांच्या पथकाने काळविटाचे शवविच्छेदन केले. अधिक तपासासाठी त्याचा व्हिसेरा राखून ठेवला आहे.

## उलवे शहरात वाढत चाललेली डेंगू, मलेरिआ व त्यावरील उपाय योजना बाबत उलवे शहर मनसे तर्फे सिडको ला



उरण (सुनिल ठाकूर ) : महाराष्ट्र नवनिर्माण सेना उलवे शहर* ह्यांच्या वतीने आज दिनांक 26/ऑगस्ट/2024 रोजी *डॉ. बाविस्कर सर,मुख्य आरोग्य अधिकारी सिडको ह्यांची भेट घेवून उलवे शहर मधे वाढत चाललेली डेंग्यू मलेरिया ची साथ, व त्यावरील उपाययोजना ह्या विषयी चर्चा करण्यात आली तसेच त्या संबधित लेखी निवेदन पत्र देण्यात आले, यावेळी मनसेचे शहर अध्यक्ष श्री राहुल पाटील, तालुका उपाध्यक्ष श्री निर्दोष गोंधळी ,उलवे शहर उपाध्यक्ष कु कल्पेश कोळी, गव्हाण विभाग अध्यक्ष श्री आकाश देशमुख, तसेच उलवे सेक्टर 24 उपाध्यक्ष संदिप म्हात्रे, ऍड.शुभम मढवी आदी सह मनसैनिक उपस्थित होते..

## प्रा. डॉ. अनिल चव्हाण यांच्या ग्रंथाला रावसाहेब दहिवाळ राज्यस्तरीय वाड्मय पुरस्कार जाहीर

**जालना/असलम कुरेशी**

प्रा. डॉ. अनिल चव्हाण यांना छत्रपती संभाजीनगर येथील पुरोगामी सामाजिक सांस्कृतिक महासंघ यांच्या वतीने आयोजित पुरोगामी स्त्रीवादी साहित्य संमेलन कार्यक्रमात 2024 चा रावसाहेब दहिवाळ राज्यस्तरीय वाङ्मयीन पुरस्कार 'ऐतिहासिक नाटकातील प्रभावशाली व्यक्तिरेखा' या ग्रंथाला जाहीर झाला आहे. असे छत्रपती संभाजीनगर येथील पुरोगामी सामाजिक सांस्कृतिक महासंघाचे अध्यक्ष समाधान दहिवाळ यांनी मत्स्योदरी कला व विज्ञान महाविद्यालय' रांजणी येथील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. अनिल चव्हाण यांना निवड पत्राद्वारे कळविले आहे. हा पुरस्कार दिनांक 31 ऑगस्ट 2024 रोजी छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेल मोदी ग्रँडमध्ये होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते प्रा. डॉ.अनिल चव्हाण यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कारांचे स्वरूप- रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ आणि ग्रंथ असे असून 'ऐतिहासिक नाटकांतील व्यक्तिरेखा एक चिकित्सक अभ्यास'( विषय संदर्भ 1960-2000 ) या साहित्यावर त्यांनी केलेले पीएच. डीचे संशोधन महत्वाचे आहे. राज्य, राष्ट्रीय स्तरावर त्यांचे संशोधन लेख त्यांच्या नावावर आहे. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी म्हणूनही त्यांनी उत्कृष्ट काम केलेले आहे. म्हणून प्रा. डॉ. अनिल चव्हाण यांच्या 'ऐतिहासिक नाटकातील प्रभावशाली व्यक्तिरेखा' या ग्रंथाला राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन केले जात आहे.



# मानवजिगरा सोन्नर यांचे ९३ वेळेस रक्तदान जीवनदान

## जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक बडे यांनी सत्कार करुन केले अभिनंदन

**बीड (प्रतिनिधी)**- बीड येथील मानवजिगरा सोन्नर यांनी आजपर्यंत 93 वेळेस रक्तदान करुन रुग्णांना रक्ताची मदत केल्यामुळे त्यांचे कौतुक करत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक बडे यांनी राज्य रक्त संक्रमण परिषदेकडून विशेष प्रमाणपत्र देवून सन्मानित केले.यावेळी सत्काराला प्रतिउत्तर देतांना मानवजिगरा सोन्नर यांनी म्हटले की,मी मरणोत्तर बॉडी ऑर्गन डोनेट करण्याचे लिखित दिले आहे. ज्यामुळे मला माणूस म्हणून समाजासाठी काही केल्याचे सुख जाणवते. याविषयी माहिती अशी की, शहरातील मानवजिगरा सोन्नर हे गेल्या अनेक वर्षांपासून स्वईच्छेने रक्तदान करत आले आहेत. कोरोनाच्या महामारीमध्ये लोक भितीपोटी घराबाहेर पडत नव्हते त्यावेळी देखील जिवाची पर्वा न करता लोकसेवेचे व्रत म्हणून गमानवजिगरा सोन्नर यांनी सतत रक्तदान करीत राहीले. बालपणापासूनच समाजसेवेची, नृत्याची व अभिनयाची आवड असल्याने गणपती उत्सवात व छोट्या मोठ्या कार्यक्रमातून मानवजिगरा सोन्नर यांनी आपली आवड जोपासली विविध नृत्य स्पर्धेत 31 मानाची पारितोषिके मिळवून नृत्यामध्ये आपले वर्चस्व असल्याचे सिद्ध करुन दाखवले आहे. राज्यात पुणे, औरंगाबाद, लातूर, उजनी, उस्मानाबाद, बीड, कळंब येथे त्यांनी प्रथम क्रमांकांची पारितोषिके मिळविली आहेत त्यांच्या कुटूंबात आई कुसुम, वडील उत्तम, तीन मोठे बंधू राम (इस्कॉनमध्ये कार्यरत) , लक्ष्मण , भरत (यशवंत सेना) हे आहेत. 2005 मध्ये मुंबई येथे पु.ल.देशपांडे महाकरंडक, मराठवाडा लावणी महोत्सव स्पर्धेत प्रथम क्रमांक तर रोटरी क्लबच्या वतीने झालेल्या कार्यक्रमात त्यांनी द्वितीय क्रमांक मिळवून त्यांनी आपल्या अभिनयाची चमक दाखवून दिली आहे. तसेच सरगम म्युझिकमल नाईट सिने अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या ग्रुप, हार्मेनी मेकर्स, सुहाने पल अशा ऑर्केस्ट्रात आपली कला सादर केली आहे. तसेच मार्शल आर्टमध्ये देखील ब्लॅक बेल्ट प्राप्त झाला आहे व युट्युब चॅनलवर अशोक सोन्नर या नावने चॅनल देखील आहे ज्यावर 4 व्हिडीओ या सर्व कार्यक्रमाच्या माध्यमातून ते प्रत्येक ठिकाणी रक्तदानाचे आवाहन करत असतात.त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077